# स्पर्धा परीक्षेसाठी अमरावती विद्यापीठातर्फे निःशुल्क मार्गदर्शन

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे राहू नये व त्याला स्पर्धा परीक्षेची इत्यंभूत माहीती मिळावी आणि रोजगार मिळावा, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने रविवार दि. १६ सप्टेंबर २०१८ रोजी प्रवेश पूर्व परीक्षा सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग हे इतर मागासवर्गीय, अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्ग तसेच खुल्या गटातील (बी.पी.एल.) उमेदवारांसाठी आहेत.

सदर मार्गदर्शन वर्गातून एम.पी.एस.सी.,रेल्वे, बँक, स्टाफ सिलेक्शन कमिशन, एल.आय.सी. आदी विभागातील विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र या विभागात २८ ऑगस्ट २०१८ ते १४ सप्टेंबर २०१८ या कालावधीत दुपारी १२ ते ५ वाजे पर्यंत प्रवेशाचे अर्ज सादर करावेत. अर्ज केलेल्या उमेदवारांची निवड प्रवेश परीक्षेव्दारे केली जाणार आहे. विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्रातच वरील अर्ज उपलब्ध असून उमेदवारांनी स्वतः ओळखपत्र व पासपोर्टसाईझ फोटो आणणे अनिवार्य आहे.

या मार्गदर्शन वर्गाचा इच्छुक उमेदवारांनी लाभ घेण्याचे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षांचे समन्वयक डॉ. आर. डी. सरोदे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०७२१-२५५३०१६ (Ext. 311),९७६६२८३१२४,९६७३८६६६६२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे सूचित केलेले आहे.

समन्वयक
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र